सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १३९ | सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. दीपक खोंडे
अमळनेर



श्री. अविनाश पवार
अमळनेर



श्री. राजेंद्र भावसार
अमळनेर

# मातेच्या शोधासाठी नेदरलँडचा महापौर नागपुरात..!

## उपकार दुधाचे आई : चित्रपटाला शोभेल अशी खरीखुरी कहाणी...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या मुलांना शोधत नेदरलॅण्ड्सच्या हिमस्टेड शहरातील भारतीय वंशाचा मुलगा नुकताच नागपुरातील ज्या अधीक्षिकेने त्याला नवजात असताना वाढविले, तिला येऊन भेटला. या भेटीने आपुलकीच्या माणसांप्रती असलेली त्याची जिव्हाळ्याची नाळ अजूनही किती पक्की आहे, हे सिद्ध झाले. विशेष म्हणजे सध्या हा मुलगा हिमस्टेडचा महापौर आहे. त्यांचा प्रवास येथे थांबत नाही. ते आजही आपल्या जन्मदात्री आईचा शोध घेत आहेत.

अगदी चित्रपटाला शोभेल अशी ही कथा खरीखुरी आहे आणि त्या ४१ वर्षीय मुलाचे नाव आहे फाल्गुन बिनेनडिक. आजपासून जवळपास ४० वर्षांपूर्वी १० फेब्रुवारी १९८५ रोजी नागपूरमध्ये जन्मलेल्या या नवजात बाळाच्या नशिबी अवघ्या तीन दिवसांतच पोरकेपण आले. रक्ताच्या नात्यांनी पाठ फिरविली आणि तो चिमुकला जीव नागपूरमधील एका अनाथाश्रमात दाखल झाला. आयुष्याची सुरुवातच अनिश्चिततेने झाली होती. सुमारे एक महिना त्या अनाथाश्रमात राहिल्यानंतर नेदरलॅण्ड्समधील एका डच दाम्पत्याने या बाळाला दत्तक घेतले. सातासमुद्रापार नेदरलॅण्ड्सला नेले. तिथे फाल्गुनला केवळ घरच नाही तर प्रेम, सुरक्षितता आणि स्वतःची ओळखही मिळाली. आज, तब्बल ४१ वर्षांनंतर, तोच अनाथाश्रमातील फाल्गुन नेदरलॅण्ड्समधील हिमस्टेड या शहराचा महापौर म्हणून जबाबदारी सांभाळत आहे. परदेशात यश, प्रतिष्ठा आणि ओळख मिळवूनही त्यांच्या मनात जन्मभूमीची ओढ कायम होती. याच ओढीपोटी फाल्गुन पुन्हा भारतात, आपल्या जीवन कहाणीच्या सुरुवातीच्या ठिकाणी नागपुरात आले. ज्या अधीक्षिकेने त्यांना तान्हुले असताना सांभाळले, त्यांना ते खास येऊन भेटले. मंगला भुसारी असे या अधीक्षिकेचे नाव आहे. या वेळी दोघांनाही झालेला आनंद शब्दात वर्णन करता न येणाराच होता. फाल्गुन महिन्यात जन्म झाला म्हणून मुलाचे नाव अधीक्षिकेने 'फाल्गुन' ठेवले होते.



### आईवर राग नाही

ते आजही आपल्या जन्मदात्री आईचा शोध घेत आहेत. तान्हे असताना टाकून गेल्याचा राग कोणत्याही जिवाला येणारच. मात्र, फाल्गून म्हणतात, माझ्या मनात कसलाही राग नाही. कुणाविषयी तक्रारही नाही. तुझा मुलगा सुरक्षित आहे, एवढेच मला सांगायचे आहे, असे ते सांगतात. या भेटीने आयुष्याचे एक वर्तुळ पूर्ण होईल, अशी भावना फाल्गुन व्यक्त करतात. त्यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अनाथगृह होते, इथेच फाल्गुन यांचे पालनपोषण झाले. जिल्हाधिकीर डॉ. विपीन इटनकर यांच्या निर्देशानुसार जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाकडून फाल्गून यांच्या आईचा शोध घेतला जाणार आहे, असे जिल्हा बालसंरक्षण अधिकीर मुस्ताक पठाण यांनी सांगितले.

# शासनाच्या कर्जमाफी समितीत कर्जबाजारी शेतकऱ्यालाच स्थान नाही..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडविण्याच्या उद्देशाने थकीत कर्ज फेडीकरिता अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने ३० ऑक्टोबर २०२५ रोजी उच्चस्तरीय समितीची स्थापना केली होती. या समितीच्या रचनेवरून सुरूवातीपासून झालेला वाद शुक्रवार. दि. ६ फेब्रुवारीच्या सुधारित शासन निर्णयानंतर आणखी जास्त चिघळला आहे.

या समितीत कर्जबाजारी शेतकरी वर्गालाच प्रतिनिधित्व देण्यात आलेले नाही. शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याबाबत शासनाला शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली ३० ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.



समितीचे अध्यक्ष यांनी शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीमध्ये अपर मुख्य सचिव (जलसंपदा), प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सचिव (पदुम), कृषी आयुक्त आणि व्यवस्थापकीय संचालक (महाआयटी) यांचा समावेश करण्याबाबत सूचित केले होते. त्यानुसार सदर समितीमध्ये उक्त सदस्यांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सहा फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये नवीन सदस्यांचा समितीत समावेशही करण्यात आला आहे.

मात्र, प्रत्यक्ष शेती कसून कर्जबाजारीपणाचा सामना करणारे किंवा शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी यांना समितीपासून मुद्दाम दूर ठेवण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या वास्तव समस्या, मानसिक ताण तणाव, सततची नापिकी, बाजारभावातील अनिश्चितता आणि वाढता उत्पादन खर्च यांचा योग्य विचार कर्जमाफी देताना होईल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. नव्याने नियुक्त करण्यात आलेले सदस्य शेतकरी किंवा शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी नसून, आर्थिकदृष्ट्या सक्षम व शहरी पार्श्वभूमी असलेले आहेत.


या संपूर्ण प्रकारावर राज्यातील पुरस्कारप्राप्त शेतकरी संघाचे अध्यक्ष ॲड. प्रकाश पाटील यांनीही तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. ज्यांच्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली आहे, त्यांचाच आवाज शासन ऐकून घेण्यास तयार नसेल, तर अशा समितीकडून न्याय्य निर्णयाची अपेक्षा कशी ठेवायची? असा प्रश्न ॲड. पाटील यांनी उपस्थित केला आहे.

### शेतकऱ्यांचा विश्वास बसेल काय ?

शेतकऱ्यांचे प्रश्न केवळ आर्थिक गणितापुरते मर्यादित नाहीत. कर्ज म्हणजे फक्त आकडा नाही, तर त्यामागे शेतकऱ्यांचे आयुष्य, कुटुंब, शिक्षण, आरोग्य आणि मानसिक आरोग्याचा प्रश्न दडलेला आहे. हे वास्तव प्रत्यक्ष शेती केलेल्या व्यक्तीलाच समजू शकते. केवळ कागदोपत्री आकडे आणि अहवालांच्या आधारे धोरण ठरविणे धोकादायक ठरू शकते. यापूर्वीही अनेक समित्या स्थापन झाल्या, अहवाल तयार झाले. मात्र, प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या जीवनात अपेक्षित आमूलाग्र बदल झालाच नाही. त्यामुळे या वेळी तरी समितीत किमान काही शेतकरी प्रतिनिधी, शेतकरी नेते किंवा पुरस्कारप्राप्त प्रगतीशील शेतकऱ्यांचा समावेश करावा, अशी जोरदार मागणी होत आहे. दरम्यान, शासनाकडून समिती सर्वसमावेशक अभ्यास करून शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय सुचवेल, असा दावा करण्यात येत आहे. मात्र, शेतकरी प्रतिनिधित्वाशिवाय तयार होणाऱ्या शिफारशींवर शेतकऱ्यांचा विश्वास बसेल का, हा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे.

# अमळगावचा यश पाटील वक्तृत्व स्पर्धेत 'महाविजेता'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तालुक्यातील अमळगाव येथील यश पाटील याने 'स्पिक फॉर इंडिया' या राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत महाविजेता होण्याचा बहुमान मिळविला आहे. अडीच लाख रुपयांच्या बक्षिसाचा तो मानकरी ठरला आहे.

यशचे मूळ अमळगाव असून, तो सध्या कल्याण येथे वास्तव्यास आहे. सर्वसामान्य परिस्थितीत वाढलेले बालपण, मर्यादित साधने. मात्र, मोठी स्वप्न बाळगून यशने आपला प्रवास सुरू केला. वडील रवींद्र संतोष पाटील एका मॉलमध्ये नोकरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. तर त्याची आई सौ. सपना रवींद्र पाटील या गृहिणी आहेत. यश पाटीलच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# ऑडिशनसाठी नोंदणी करा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मुंबई येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक यांच्यातर्फे विविध कार्यक्रम सादर होत असतात. 'साहित्यसूर्य सावरकर' हा स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अलौकिक प्रतिभेवर आधारीत दृकश्राव्य कार्यक्रम शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी सादर केला जाणार आहे. या आणि अशा प्रेरणादायी कार्यक्रमांसाठी गुणी, नवोदित गायक, गायिका, पोवाडा गायक, अभिनय आणि काव्यवाचन उत्तम करू शकणाऱ्या कलाकारांची ऑडिशन घेतली जाणार आहे. सावरकरांची गीते, वेचे, नाट्य कलाकृती सादर करण्यासाठी तरूणांना प्रोत्साहन मिळावे हा या मागचा उद्देश आहे. बुधवार, दि. ११ व गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ ते ६ या वेळात ही ऑडिशन स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, दादर (प.), मुंबई येथे होणार आहे. या ऑडिशनसाठी १०० रुपये शुल्क आकारले जाईल. नोंदणीसाठी (९२२००७०३८६) व (९५९४९६२५८८) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

### दिनविशेष

०९ फेब्रुवारी

- साने गुरुजींनी नाशिक तुरुंगात असताना 'श्यामची आई' हे पुस्तक लिहिण्यास सुरुवात केली.
- स्वतंत्र भारताची पहिली जनगणना करण्यात आली.
- बोईंग-७४७ विमानाचे पहिले चाचणी उड्डाण करण्यात आले.
- अपोलो कार्यक्रम: तिसऱ्या मानवी अभियान चंद्रावर उतरल्यानंतर अपोलो १४ पृथ्वीवर परतले.
- संगीतकार रवींद्र जैन यांना मध्य प्रदेश सरकारने लता मंगेशकर पुरस्काराने सन्मानित केले.



जानवे (ता. अमळनेर) : आरोग्य तपासणी शिबीराप्रसंगी उपस्थित डॉ. भूषण पाटील, डॉ. सुमित पाटील, डॉ. संजय रनाळकर आदी.

# जानवे प्रा. आ. केंद्रात मोफत कर्करोग निदान शिबीर

## सुमारे २२८ जणांनी घेतला लाभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील जानवे प्राथमिक आरोग्य केंद्रात शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी कर्करोग तपासणी व्हॅनच्या माध्यमातून विशेष आरोग्य शिबीर घेण्यात आले. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. भूषण पाटील यांनी स्तन व गर्भाशयमुख (ग्रीवा) कर्करोगाची तपासणी केली. दंत शल्यचिकित्सक डॉ. सुमित पाटील यांनी मुखाच्या कर्करोगाची तपासणी केली. रुग्णांना आवश्यक मार्गदर्शन केले. या शिबिराचा एकूण २२८ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. कर्करोगाचे लवकर निदान होऊन वेळीच उपचार मिळावेत, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तपासणीदरम्यान संशयित रुग्णांना पुढील तपासणी व उपचारांसाठी संदर्भ देण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मिनल करनवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर पार पडले. वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय रनाळकर व डॉ. रिया शिसोदे, डॉ. अतुल चौधरी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## अंगणातील चिमणी कुठे गायब झाली?



सकाळी-सकाळी प्रसन्न वातावरणात, दुपारी गल्लीत, अंगणात, घराच्या गच्चीतून येणार चिमणीचा सुंदर किलबिलाट बंद झाला आहे. काय घडले असेल की अचानक या चिमण्या गायब का झाल्या आहेत. कोणते घटक कारणीभूत आहेत हे पाहूयात. यातील सर्वात महत्वाचे कारण आहे मोबाईल टॉवर टॉवर्समधून येणाऱ्या रेडिएशनचा परिणाम चिमण्यांच्या अंड्यांवर होतो. अंडी उबवली जात नाहीत किंवा पिल्ले जगत नाहीत, असे अनेक अभ्यासक सांगतात. घरटी बांधायला जागाच नाही. पूर्वी कौलारू मोकळी घरे होती. भिंतींमधील कपारी, छपराखालील जागा याठिकाणी चिमण्यांची घरटी बनायची. आधुनिक रहिवासी टॉवर्स व आरसीसी बांधकामे यामुळे चिमण्यांना घरटी बांधण्यासाठी जागाच राहिली नाही. पूर्वी राहिलेले धान्य बाहेर अंगणात टाकले जायचे ते पूर्णपणे बंद झाले आहे.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा गुरुवारी संप

## विविध मागण्यासाठी जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : केंद्र सरकारने कामगार व कर्मचारी हिताचे विद्यमान कायदे रद्द करून चार नव्या श्रम संहिता लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या निषेधार्थ तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या देशव्यापी लाक्षणिक संपात सहभागी होण्याचा निर्णय अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या समन्वय समितीने घेतला आहे. या संपाच्या पार्श्वभूमीवर जळगाव येथे जिल्हा परिषदेत धरणे आंदोलन होणार आहे.



नव्या श्रम संहितांचा पुनर्विचार करून अन्यायकारक निर्णय रद्द करावा. अंगणवाडी सेविका व मदतनीसांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देणे, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ग्रॅच्युटी लागू करणे, तसेच वेतनवाढीबाबत गुजरात उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे. याशिवाय प्रोत्साहन भत्ता मानधनात वर्ग करणे योजना कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा व मासिक पेन्शन लागू करणे, विविध योजना अंतर्गत थकीत मोबदला देणे, योजना बाह्य कामांचा बोजा टाळणे, उन्हाळी सुट्टी वाढवणे, भरपगारी आजार रजा लागू करणे, एफआरएसमधील तांत्रिक अडचणी दूर करणे आणि पोषण ट्रॅकरच्या कामासाठी मोबाइल व रिचार्ज भत्ता देणे आदी आदी मागण्यांचा समावेश आहे.

### पोषण ट्रॅकर ठेवणार बंद

या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संपाच्या दिवशी अंगणवाडी केंद्रांमधील दैनंदिन कामकाज बंद ठेवून पोषण ट्रॅकर न उघडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता जि. प. येथे गणवेश परिधान करून उपस्थित राहून धरणे आंदोलन यशस्वी करावे, असे आवाहन रामकृष्ण पाटील व जिल्ह्यातील प्रकल्प प्रमुख व बिट प्रमुखांनी केले आहे.

## संपादकीय

# हसण्याचा हरवलेला अर्थ

आजचा माणूस अनेक गोष्टींनी समृद्ध झाला असला, तरी एका अत्यंत मूलभूत गोष्टीत तो दरिद्री होत चालला आहेती म्हणजे हसू. दिवसाची सुरूवात आरशात स्वतःकडे पाहून हसण्याने करण्याची साधी सवयही आपण विसरत चाललो आहोत. कालच्या चिंता, जबाबदाऱ्या आणि अपूर्णतेचे ओझे चेहऱ्यावर घेऊनच आपण आजचा दिवस सुरू करतो. हे ओझे काळानुसार कमी होण्याऐवजी वाढतच जाते आणि त्याचबरोबर चेहऱ्यावरचे हसू मात्र हळूहळू नाहीसे होत जाते. आज बहुतेक लोकांची अवस्था अशी आहे, की 'तुम्ही शेवटचं कधी मनापासून हसलात?' या प्रश्नाचे उत्तर देताना ते गप्प होतात. हसू जणू आयुष्याच्या गंभीरतेत हरवून गेले आहे. मात्र मानसशास्त्र सांगते, की हसू हे केवळ आनंदाचे प्रतीक नसून, ते मनाचे एक प्रभावी औषध आहे. हसताना मेंदूत एंडॉर्फिन्स नावाची रसायने तयार होतात, जी तणाव कमी करतात, वेदना शमवतात आणि मनाला हलके करतात. म्हणजेच हसू ही भावना नसून, ती एक नैसर्गिक जैविक प्रक्रिया आहे, जी आपल्याला मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या सुदृढ ठेवते.

जे लोक वारंवार हसतात ते तुलनेने अधिक सकारात्मक असतात आणि नैराश्यापासून दूर राहतात, हे अनेक अभ्यासांतून स्पष्ट झाले आहे. तरीही प्रश्न उरतोचआपण हसणे थांबवत का जातो? याचे उत्तर दडलेले आहे. आपल्या अतिगंभीर जीवनशैलीत. लोक काय म्हणतील, अपयशाची भीती, सततची तुलना आणि भविष्यातील चिंता या सगळ्यांमुळे आपण आपल्या भावना दाबून ठेवतो. मानसशास्त्रात यालाच इमोशनल सप्रेशन असे म्हटले जाते. परिणामी, हसूही दडपले जाते. आपण स्वतःलाच सांगतो, की 'आता मोठं झालोय, हसायला वेळ नाही.' प्रत्यक्षात हसण्यासाठी वेळ लागत नाही; लागतो तो मनाला दिलासा देण्याचा मोकळेपणा. हसू हे संवादाचे प्रभावी माध्यम आहे. हसरा माणूस सहजपणे लोकांशी जोडला जातो. त्याच्याजवळ मन उघडते, नात्यांमधील ताण कमी होतो आणि भावनिक बंध अधिक दृढ होतात. महत्त्वाची बाब म्हणजे आनंदी असलो तरच हसू येते असे नाही.

अनेक संशोधने सांगतात, की जाणीवपूर्वक केलेले हसूही मेंदू खऱ्या आनंदासारखेच स्वीकारतो. म्हणजेच हसू हे केवळ आनंदाचे परिणाम नसून, ते आनंदाचे कारणही ठरू शकते. जसे शरीरासाठी व्यायाम आवश्यक आहे, तसेच मनासाठी हसू आवश्यक आहे. अर्थात, हसतानाही संवेदनशीलता आणि शहाणपण गरजेचे आहे. योग्य वेळ, योग्य जागा आणि योग्य पद्धतीने व्यक्त झालेले हसू व्यक्तिमत्त्वावर सकारात्मक छाप सोडते. लहान-सहान गोष्टींचा आनंद घेणे, क्षणभर थांबून हसणे, जीवनाच्या गंभीरतेवर थोडंसे हलके औषध लावणे हेच खरे शहाणपण आहे. म्हणूनच आज प्रत्येकाने स्वतःला एक साधा प्रश्न विचारायला हवा. आपण दररोज हसतो का, की फक्त जबाबदाऱ्यांमध्ये अडकून आयुष्य निभावतो? आयुष्याचे ओझे हलके करायचे असेल, तर हसणे शिकावेच लागेल. जसे शरीराला अन्न लागते, तसेच मनाला हसू लागते. कारण अखेरीस सत्य एकच आहे, की हसणारा माणूस आयुष्य जगतो आणि न हसणारा फक्त निभावतो.

# मुंबईतील शिक्षिकेचा दुबईत सन्मान!

## कोटींच्या प्रतिष्ठित पुरस्काराच्या मानकरी; पाच हजार लोकांमधून झाली निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुंबईतील शिक्षिकेचा आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे. २४ वर्षांच्या अथक प्रयत्नांचे फळ मिळाल्याची भावना त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली. झोपडपट्ट्यांमध्ये जात मुलांना शिकवण्याचा ध्यास घेतलेल्या रूबल नागी या जेम्स एज्युकेशन ग्लोबल टीचर पुरस्काराच्या त्या विजेत्या ठरल्या आहेत. या अंतर्गत त्यांना १० लाख अमेरिकन डॉलर्स देण्यात आले आहेत. रुबल नागी यांची निवड ही १३९ देशांतील ५ हजार शिक्षकांमधून करण्यात आली आहे. विश्व सरकार शिखर समेंलनाच्या शेवटच्या दिवशी ही निवड करण्यात आली आहे. दुबईचे क्राउन प्रिन्स शेख हमदान बिन मोहम्मद बिन राशिद अल मकतूम यांच्या हस्ते जीईएमएस एज्युकेशनचे संस्थापक सनी वर्गी यांनी हा पुरस्कार दिला.

**रूबल नागी भावुक**

पुरस्कार स्वीकारल्यानंतर रूबल नागी या भावुक झाल्या होत्या. त्या म्हणाल्या की, हे एक स्वप्न पूर्ण होण्यासारखे आहे. हा पुरस्कार गेल्या २४ वर्षातील कठोर परिश्रमाचे फळ



आहे. सकाळी उठून भारतातील दूर्गम भागात, झोपडपट्ट्यांमध्ये जात मुलांना शिकवणे आणि त्यांच्याकडून शिकणे हे माझे एकमेव लक्ष्य होते. मुलांचे शिक्षण खंडीत होवू नये. भारतातील प्रत्येक मुलाला शाळेत पाहणे हे माझे स्वप्न आहे.

मिसाल इंडिया, मिसाल मुंबई

रूबल यांनी मिसाल इंडिया या योजनेबद्दल सांगितले, की हा एक असा उपक्रम होता ज्याद्वारे १०० पेक्षा जास्त झोपडपट्ट्या आणि गावे यामधील १० लाखाहून अधिक मुलांना कमी खर्चात, कला शिक्षण प्रदान करण्यात आले. त्या मुलांना शिक्षणासोबत अंक ज्ञान, जीवन कौशल्ये आणि व्यावसायिक प्रशिक्षण यासंबंधी माहिती देतात. त्यांनी मिसाल मुंबई नावाचाही उपक्रम तयार केला. देशातील पहिल्या झोपडपट्ट्या सुधारणा उपक्रमांतर्गत १, ५५, ००० हून जास्त घरे रंगवण्यासोबतच स्वच्छता आणि पेयजल सुधारण्याचे काम करण्यात आले. स्वच्छता कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

ग्लोबल टीचर पुरस्कार


ग्लोबल टीचर पुरस्काराची सुरुवात ही सर्वोत्कृष्ट शिक्षकास सन्मानित करण्यासाठी करण्यात आली. वर्की फाउंडेशन आणि युनेस्को यांच्या सहयोगाने सुरु करण्यात आलेला उपक्रम आहे. या पुरस्कारासाठी आतापर्यंत १ लाखांहून अधिक अर्ज केले गेले आहेत.

# दुचाकीचे हेडलाईट दिवस- रात्र का सुरू असतात?

## काय आहे वैज्ञानिक आधार ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दुचाकी वाहनांमध्ये २०१७ पासून हेडलाईटचा स्विच काढून टाकण्यात आला. बीएस- व्हीआय वाहनांची श्रेणी सुरु झाल्यानंतर हा बदल करण्यात आला. मात्र, असा निर्णय घेण्यापाठीमागे काय कारण असू शकते. किंवा दिवसरात्र असे हेडलाईट का सुरु ठेवले जातात याचे वैज्ञानिक कारण काय हे पाहूया.



या तंत्रज्ञानाला ॲटोमॅटिक हेडलाईट ऑन असे म्हणतात. या निर्णयामागे रस्ते सुरक्षाविषयक उद्दिष्टे आहेत. याचे पहिले महत्वाचे कारण आहे पेरिफेरल व्हिजन पेरीफेरल व्हीजन. मानवी डोळ्यांची रचना अशी आहे, की आपल्याला सरळ रेषेतील वस्तूंपेक्षा हालचाल करणारी किंवा चमकणारी वस्तू लवकर जाणवते. दिवसा हेडलाईट सुरू असल्याने इतर वाहनचालकांना (विशेषतः आरशात पाहणाऱ्यांना) तुमच्या दुचाकीचे अस्तित्व त्वरित जाणवते. ज्यामुळे अपघाताची शक्यता कमी होते.

रस्त्यावरील अपघातांचे एक मुख्य कारण म्हणजे समोरून किंवा बाजूने येणारे वाहन वेळेत न दिसणे. दिवसा प्रखर सूर्यप्रकाश असताना सावलीत किंवा धुरकट वातावरणात गडद रंगाच्या दुचाकी पटकन नजरेत येत नाहीत. हेडलाईट चालू असल्यास समोरच्या चालकाचे लक्ष दुचाकीकडे लगेच जाते. पाऊस, धुके किंवा पहाटेच्या वेळी अनेकदा चालक हेडलाईट लावायला विसरतात. एएचओमुळे ही मानवी चूक टळते. खराब हवामानातही वाहन स्पष्टपणे उठून दिसते. युरोप आणि अनेक प्रगत देशांमध्ये हा नियम अनेक वर्षांपासून लागू आहे. तिथे या नियमामुळे दुचाकी अपघातांच्या प्रमाणात १० ते १५ टक्के घट झाल्याचे दिसून आले आहे. आधुनिक गाड्यांची इंजिने आणि बॅटरी ही 'एएचओ' लक्षात घेऊनच डिझाइन केलेली असतात. त्यामुळे बॅटरीवर फारसा ताण पडत नाही. पूर्वी समोरच्याला दिवसा हेडलाईट सुरु असल्याचा इशारा केला जायचा. मात्र, आता बहुतांश लोकांना हे सरकारी नियमामुळे असल्याचे समजू लागले आहे.

# आकाशातील 'तारा तुटणे' म्हणजे काय? ते कुठे जातात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आकाशात उल्का पाहणे हा अनेकांसाठी कुतूहलाचा विषय असतो. 'तुटता तारा' पाहिल्यावर इच्छा पूर्ण होते, अशी आजही जनमानसात धारणा आहे. मात्र, तारा तुटणे म्हणजे काय? आणि ते कुठे जातात? याविषयी जाणून घेऊयात.

आकाशात चमकणारी प्रत्येक उल्का पृथ्वीपर्यंत पोहोचतेच असे नाही. बहुतांश उल्का हवेतच विरून जातात. ज्याला आपण 'तुटता तारा' म्हणतो, तो प्रत्यक्षात अवकाशातील एक दगड असतो. वातावरणात शिरताना त्याला 'उल्का' असे संबोधले जाते. हे तुकडे म्हणजे अवकाशातील लघुग्रह किंवा धूमकेतूंनी मागे सोडलेला धुळीचा आणि खडकांचा ढिगारा असतो. पृथ्वी जेव्हा या अवकाशातील कचऱ्याच्या पट्ट्यातून प्रवास करते, तेव्हा वातावरणात



प्रवेश करणाऱ्या कणांमुळे प्रकाशाच्या सुंदर रेषा उमटतात. अनेकदा मंगळ ग्रहाच्या कक्षेतून विचलित झालेले हे खडक ग्रहांच्या बदलत्या स्थितीमुळे थेट पृथ्वीच्या दिशेने आकर्षित होतात. वातावरणात प्रवेश करताना या उल्कांचा वेग थक्क करणारा असतो. त्या ताशी ४० ते ७० हजार किलोमीटर वेगाने प्रवास करतात. प्रचंड वेग आणि हवेचे घर्षण यामुळे या शिळा तापतात आणि पेट घेतात. ज्यामुळे आकाशात अग्नीची रेषा उमटलेली दिसते. जळताना या उल्का हवेतच नष्ट होतात आणि एक तेजस्वी मार्ग मागे सोडतात. याच प्रक्रियेला आपण सामान्य भाषेत 'तारा तुटणे' असे म्हणतो.

# छत्रपती शिवाजी महाराजांनी बलाढ्य रायगड किल्ला कसा जिंकला ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**संकल्प** : श्री रायरेश्वर मंदिरात छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याचा निर्धार केला आणि संघर्षाची पायाभरणी झाली.

**हस्तगत** : राजगड, तोरणा, सिंहगड, कोरीगड व पुरंदर जिंकून स्वराज्याचा कणा मजबूत करण्यात आला.

**प्रारंभ** : १६४८ मधील पुरंदरची पहिली लढाई स्वराज्याच्या सैनिकी वाटचालीचा निर्णायक टप्पा ठरली.

**हल्ला** : १५ जानेवारी १६५६ रोजी चंद्रराव मोरेंच्या जावळीवर अचानक वेगवान आक्रमण झाले.

**आश्रयास** : जावळीच्या लढाईत पराभूत झाल्यानंतर चंद्रराव थोड्या सैन्यासह व कुटुंबासह निसटून थेट रायरी (रायगड) किल्ल्यावर आश्रयास गेला.

**विस्तार** : चंद्रराव मोरेंचा मुलुख महाबळेश्वर ते महाडपर्यंत पसरलेला होता.

**किल्ला** : रायरीचा किल्ला याच मुलखात होता.

**आश्रय** : चंद्रराव मोरे कुटुंबासह रायरी किल्ल्यावर येऊन थांबले तेव्हा शिवाजी महाराज जावळी तच थांबले होते

**व्यवस्था** : जावळी जिंकल्यानंतर शिवराय अडीच महिने प्रदेशाची घडी नीट बसवत राहिले.

**मोहीम** : ३० मार्च १६५६ रोजी शिवराय रायगडाकडे निघाले आणि निर्णायक टप्पा सुरू झाला.

**नाकेबंदी** : ६ एप्रिलला रायगडाच्या पायथ्याशी पोहोचताच गडाला पूर्ण वेढा घातला गेला.

**धैर्य** : चंद्ररावाने महिनाभर तग धरला. मात्र, पर्याय संपत चालल्याचे स्पष्ट झाले.

**मध्यस्थी** : शिवराय यांच्या सैन्यात असलेले चंद्ररावाचे भाचे हैबतराव आणि बाळाजी नाईक शिळीमकर देशमुखांच्या मध्यस्थीमुळे चंद्रराव सुरक्षितपणे खाली उतरला.

**प्रवेश** : एप्रिलच्या अखेरीस किंवा मे १६५६ च्या सुरुवातीला रायगड स्वराज्यात दाखल झाला.

**भविष्य** : याच रायगडावर पुढे राज्याभिषेक होऊन तो स्वराज्याची पहिली राजधानी ठरला.

# विमानातून प्रवासी उतरल्यानंतर फ्लाइट अटेंडेंट काय करतात?

**९९ टक्के लोकांना माहिती नाही उत्तर**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विमान सुरक्षितपणे जमिनीवर उतरले, की अनेकांना वाटते एअर होस्टेस आणि फ्लाइट अटेंडंट्सची जबाबदारी तिथेच संपते. मात्र, वास्तव यापेक्षा वेगळे आहे. प्रवासी विमानातून उतरल्यावरही एअर होस्टेसवर अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या असतात. ज्या पुढील उड्डाण सुरक्षित, सुरळीत आणि वेळेत होण्यासाठी अत्यंत आवश्यक असतात.

विमानातून शेवटचा प्रवासी बाहेर पडताच फ्लाइट अटेंडंट्सचे काम पुन्हा सुरू होते. केबिनची तपासणी, सुरक्षिततेशी संबंधित बाबी पाहणे, प्रवाशांनी मागे सोडलेल्या वस्तू तपासणे आणि पुढील प्रवासासाठी विमान तयार ठेवणे ही सर्व कामं त्यांच्या ड्युटीचा अविभाज्य भाग आहेत. गोल्ड विंग्सच्या एका अहवालानुसार, तब्बल १० वर्षे एव्हिएशन क्षेत्रात काम केलेल्या एका महिलेने जिने फ्लाइट अटेंडंटपासून केबिन मॅनेजरपर्यंत विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. आपले अनुभव शेअर केले आहेत. तिच्या मते, एका साधारण उड्डाणानंतरही एअर होस्टेसची भूमिका संपत नाही तर ती अधिक जबाबदारीची



होते.

विमान ठिकाणी पोहोचताच सर्वप्रथम एअर होस्टेस प्रवाशांना सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने विमानातून खाली उतरण्यास मदत करतात. त्यानंतर पुढील उड्डाणासाठी किती वेळ उपलब्ध आहे यावर त्यांची पुढील कामे अवलंबून असतात. जर पुढील उड्डाणासाठी फक्त ३० मिनिटे किंवा त्याहूनही कमी वेळ उपलब्ध असेल तर अनेक वेळा एअर होस्टेस विमानातून बाहेरही पडत नाहीत. त्या थेट केबिनमध्येच थांबून पुढील प्रवासासाठी आवश्यक तयारी सुरू करतात. या वेळेत केबिन स्वच्छतेवर विशेष लक्ष दिले जाते. अनेकदा सफाई कर्मचाऱ्यांना मदत करणे किंवा स्वच्छतेवर लक्ष ठेवणंही फ्लाइट अटेंडंट्सचेच काम असते. सुरक्षेपासून जेवणापर्यंत सर्व गोष्टींची तपासणी विमान पुढील उड्डाणासाठी पूर्णपणे सज्ज आहे की नाही याची खात्री करणे ही एअर होस्टेसची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी असते. केबिनमधील सुरक्षा उपकरणे योग्य ठिकाणी आहेत का ? इमर्जन्सी उपकरणांची स्थिती, सीट बेल्ट, लाईफ जॅकेट्स यांची तपासणी केली जाते. याशिवाय, प्रवाशांसाठी दिले जाणारे जेवण योग्य दर्जाचे आहे का, ते नियमानुसार लोड झाले आहे का, यावरही फ्लाइट अटेंडंट्स लक्ष ठेवतात. या सर्व कामांसोबतच एअर होस्टेसना उड्डाणासंदर्भातील रिपोर्टही द्यावा लागतो. प्रवासादरम्यान घडलेल्या कोणत्याही विशेष घटना, प्रवाशांच्या तक्रारी, सुरक्षेशी संबंधित बाबी किंवा तांत्रिक निरीक्षणे यांचा उल्लेख या अहवालात केला जातो. हा अहवाल पुढील उड्डाणासाठी आणि एकूणच विमानसेवेच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा ठरतो.

# माले घोटेल वांगानी भाजी, वरण बट्टी आवडस...!

## हिंदी, साऊथ इंडस्ट्री गाजवणारी मृणाल ठाकूर जेव्हा अहिराणीत बोलते





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खानदेशातील धुळ्यात एका मराठी कुटुंबात जन्म झालेली अभिनेत्री मृणाल ठाकूर हिंदी तसेच साऊथ इंडस्ट्रीत अल्पावधीत लोकप्रिय ठरली आहे. मृणाल हिंदीसह मराठी, त्यातल्या त्यात अहिराणी भाषा खूप चांगली बोलते. नुकतेच मुंबईतील एका चित्रपटाच्या इव्हेंट दरम्यान तिला जळगावच्या एका पत्रकार तरूणीने 'तुले खावाले काय आवडस' म्हणून अहिराणीत विचारले. तर 'माले घोटेल वांगानी भाजी, वरण बट्टी आन् एखादं बट्ट खावाले आवडस', असे उत्तर तिने दिले.

मृणाल आणि सिद्धांत चतुर्वेदी 'दो दिवाने सहर मै' या सिनेमाच्या एका इव्हेंटमध्ये सहभागी झाले होते. तेव्हा समोर उपस्थित असलेल्या मूळ जळगावमधील एका पत्रकार तरूणीने मृणाल ठाकुरशी थेट अहिराणी भाषेत संवाद साधला. पत्रकारांसमोर बोलताना मृणाल सुद्धा सराईतपणे अहिराणी भाषेत बोलली. या दरम्यान, आपल्याला खानदेशात प्रसिद्ध असलेली घोटलेली वांग्याची भाजी, सोबत वरण- बट्टी तसेच एखादे भाजीचे बट्ट म्हणजे रस्सा खायला आवडत असल्याचे तिने आवर्जून सांगितले. अहिराणी भाषेचा अभिमान असल्याने एरवी मृणाल जेव्हा संधी मिळेल तेव्हा ती अहिराणी भाषेत तयार केलेले व्हिडीओ समाज माध्यमावर टाकते. तिचे व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल देखील होतात.

दूरदर्शनवरील मालिकांपासून ते बॉलीवूड आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीपर्यंतचा प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण करणारी अभिनेत्री म्हणजे मृणाल ठाकूर अभिनय, सौंदर्य आणि साधेपणाच्या जोरावर मृणालने अल्पावधीतच प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. मृणालने मनोरंजन विश्वात पदार्पण केले ते 'मुझसे कुछ कहती... ये खामोशियां' या मालिकेतून. या मालिकेमुळे तिला छोट्या पडद्यावर ओळख मिळाली असली, तरी झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'कुमकुम भाग्य' मुळे तिच्या लोकप्रियतेला खऱ्या अर्थाने गती मिळाली. या मालिकेतील तिच्या भूमिकेने ती घराघरात पोहोचली. आणि टीव्हीवरील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक म्हणून तिची ओळख निर्माण झाली.

टेलिव्हिजन विश्व गाजवल्यानंतर मृणालने पुन्हा एकदा चित्रपटांकडे वळण्याचा निर्णय घेतला. बॉलीवूडमध्ये तिने 'सुपर ३०' या चित्रपटातून दमदार पुनरागमन केले. या चित्रपटात तिने सुपरस्टार हृतिक रोशनसोबत स्क्रीन शेअर केली होती. साधी, भावनिक आणि प्रभावी भूमिका साकारत मृणालने प्रेक्षकांसह समीक्षकांचेही लक्ष वेधून घेतले. यानंतर तिला एकामागून एक महत्त्वाच्या चित्रपटांच्या ऑफर्स मिळाल्या. नुकतीच ती अजय देवगनसोबत 'सन ऑफ सरदार'च्या रिमेकमध्ये झळकली. या चित्रपटातून तिने पुन्हा एकदा आपली व्यावसायिक ताकद सिद्ध केली आहे. बॉलीवूडमध्ये स्वतःचे स्थान निर्माण करत असतानाच मृणालने दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतही यशस्वी पाऊल टाकले. तिथेही तिच्या अभिनयाला चांगली दाद मिळत असून, वेगवेगळ्या भाषांतील भूमिका साकारत तिने आपली अष्टपैलू प्रतिभा दाखवून दिली आहे. विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर यश मिळवूनही मृणालचे मराठी आणि अहिराणी भाषांशी असलेले घट्ट नाते आजही कायम आहे. विविध मुलाखतींमधून ती आपल्या मूळ संस्कृतीबद्दल, भाषेबद्दल अभिमानाने बोलताना दिसते. समाज माध्यमांवरही ती अनेकदा मराठी आणि अहिराणीतून संवाद साधते, जे तिच्या चाहत्यांसाठी विशेष आकर्षण ठरते. टीव्ही, बॉलीवूड आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टी, असा बहुआयामी प्रवास करत असताना मृणाल ठाकूरने मेहनत, सातत्य आणि जमिनीशी नाळ जोडून ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# गंभीरच्या एका मेसेजने बदलला खेळ

## चालू सामन्यात सूर्यकुमारला दिला 'तो' एक गुरुमंत्र; कॅप्टनने सांगितली इनसाइटड स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

टी-२० विश्वचषकाच्या मोहिमेला शनिवारी सुरूवात झाली आहे. पहिल्याच दिवशी तीन सामने रंगले. तिसरा सामना भारत आणि अमेरिका या संघांमध्ये रंगला. अमेरिकेने नाणेफेक जिंकले आणि प्रथम बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम बॉलिंग करताना अमेरिकेने भारताच्या फलंदाजांनी जास्त धावांचा डोंगर उभारू दिला नाही. भारताला फक्त १६१ धावा करता आल्या तरीही भारताने सामना २९ धावांनी जिंकला. आता यानंतर भारताचा कर्णधार सूर्यकांत यादव या सामन्याबद्दल काय म्हटले आहे ते पाहा...

अमेरिकेवरील या प्रभावी विजयाने भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव आनंदी होता. सामन्यानंतर आपले विचार मांडताना तो म्हणाला, की 'आम्हाला माहीत होते, की हा दिवस येईल. मला वाटले की फलंदाजाने शेवटपर्यंत क्रिजवर राहणे महत्वाचे आहे, कारण ते १८०-१९० च्या विकेटऐवजी १४०-१९० च्या विकेटसारखे वाटत होते. गौती भाईंनी मला १४ व्या षटकानंतर ब्रेक दरम्यान शेवटपर्यंत क्रिजवर राहण्याचा सल्ला दिला. त्यांना माहीत होते, की मी नंतर कव्हर करेन. मला अशा परिस्थितीत आणि पृष्ठभागावर खेळण्याचा अनुभव आहे.'

भारतीय कर्णधार म्हणाला, की 'सामन्यादरम्यान माझ्यावर किती दबाव होता हे फक्त मलाच माहीत आहे. मी येथे खूप क्रिकेट खेळलो आहे. मला स्वतःवर विश्वास होता की जर मी शेवटपर्यंत खेळलो तर संघ चांगल्या स्थितीत असू शकतो. मी येथे, क्रॉस मैदानावर आणि आझाद मैदानावर खूप क्रिकेट खेळलो आहे. त्यामुळे मला येथे कसे फलंदाजी करायची हे माहीत होते. क्युरेटर आणि ग्राउंडस्टाफने खूप प्रयत्न केले. पण बऱ्याच गोष्टी त्यांच्या नियंत्रणाबाहेर आहेत. आम्ही अधिक चांगली फलंदाजी करू शकलो असतो. आम्हाला कळले, की आम्हाला भागीदारी बांधण्यावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे.

### भारताचा अमेरिकेविरुद्ध विजय

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ च्या त्यांच्या पहिल्या सामन्यात भारतीय संघ २९ धावांनी विजय मिळवू शकला. मुंबईत नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने २० षटकांत नऊ गडी गमावून १६१ धावा केल्या. चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करणारा सूर्यकुमार यादव सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता, त्याने १७१.४२ च्या स्ट्राईक रेटने ४९ चेंडूंत ८४ धावा केल्या. त्यांच्याशिवाय तिलक वर्माने १६ चेंडूंत २५ धावांचे योगदान दिले.

भारताने दिलेल्या विजयासाठी १६२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिकेला २० षटकांत आठ गडी गमावून फक्त १३२ धावा करता आल्या. संजय कृष्णमूर्ती आणि शुभम रांजणे यांनी अनुक्रमे प्रत्येकी ३७ धावांचे योगदान दिले. या दोन फलंदाजांव्यतिरिक्त मिलिंद कुमारने ३४ धावा केल्या. तोही संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.



# राजेश पांडेय : पोलीस दलातील बहिर्जी नाईक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



शत्रूच्या गोटात जाऊन वेश बदलून त्यांच्यातला एक बनून माहिती काढणारे शिवरायांच्या गुप्तहेर खात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक यांच्या चातुर्याच्या, शौर्याच्या कथा आपण ऐकल्या असतील. असाच एक बहिर्जी नाईक मुंबई पोलीस दलात कार्यरत आहे. हेड कॉन्स्टेबल राजेश पांडेय असे यांचे नाव आहे. स्वतःचा वेश बदलून पांडेय यांनी आजवर 'मिसिंग'ची तक्रार आलेली तब्बल ७०० प्रकरणे निकाली काढली आहेत.

राजेश पांडेय यांनी भारतभर फिरून बेपत्ता झालेल्या अनेकांचा शोध लावलाय. 'मिसिंग'ची तक्रार आलेल्या अनेकांचा शोध घेण्यासाठी त्यांनी दिल्लीपासून थेट दार्जिलिंग गाठले आहे. 'एखाद्या गुन्ह्याचा तपास करण्यापेक्षा मला बेपत्ता लोकांना शोधून काढून त्यांची आपल्या कुटुंबीयांशी भेट घडवून देणे अधिक महत्त्वाचे काम वाटते. त्यातही बेपत्ता झालेल्या लहान मुला-मुलींना आपल्या आई-वडिलांकडे सुखरूप पोहोचविण्यासारखे समाधानाचे काम नाही, असे मला वाटते' असे ५२ वर्षांचे राजेश पांडेय सांगतात.

### असे आहे 'पांडेय मॉड्यूल'...

बेपत्ता लोकांचा शोध घेण्याची राजेश पांडेय यांची ही अनोखी पद्धत पाहून मुंबईचे माजी पोलीस आयुक्त दत्ता पडसलगीकर यांनी त्यांच्या शोधमोहिमेच्या पद्धतीला 'पांडेय मॉड्यूल' असे नाव दिले आहे.

२०१४ मध्ये घरकाम करणारी मुलगी बेपत्ता झाल्याची केस आली होती. राजेश पांडेय यांच्याकडे या प्रकरणाच्या तपासाची जबाबदारी सोपविण्यात आली. राजेश पांडेय यांनी सांगितले, की 'या प्रकरणात आम्हाला तपास केल्यावरही फार काही हाताशी लागले नव्हते. मात्र, एक दिवस अचानक त्या मोलकरणीने तिच्या मालकिणीला फोन केला आणि आम्ही तो नंबर ट्रेस करत तिला शोधायला बंगालच्या एका गावी पोहोचलो आहे. तेथे एका छोट्या परगण्यात ती आम्हाला सापडली.'

### कुरिअर बॉय बनून गाठले घर

राजेश पांडेय यांनी आपल्या साथीदारांच्या सहाय्याने बंगाल गाठले. मोलकरणीने ज्या नंबरवरून फोन केला त्या फोन नंबरवरील नोंदणीकृत पत्ता अस्पष्ट होता. ती मोलकरीण नेमकी कुठे आहे हे शोधून काढण्यासाठी शक्कल लढवण्यात आली. पांडेय यांनी त्या नंबरवर पुन्हा फोन करण्याचा सल्ला दिला. एका कुरिअर कंपनीकडून गिफ्ट पार्सल पाठवायचे आहे, असे सांगून पत्ता मागायला सांगितला. त्यानंतर पांडेय स्वतः कुरिअर बॉय बनून त्या पत्त्यावर पोहोचले.

### सूत्रांची माहिती...

बंगालमध्ये पोहोचल्यावर पांडेय यांच्या लक्षात आले, की त्या मोलकरीण मुलीचे लग्न लावून देण्यात आले असून तिच्या आई-वडिलांशी बोलण्यासदेखील मनाई करण्यात आली. पांडेय यांनी त्या परिसरातील टेलर, गेस्ट हाऊसचे मालक, हॉटेलमधील कामगार अशा अनेकांशी ओळख काढून सापळा रचून तिची सुटका केली.

राजेश पांडेय यांनी आपल्या २६ वर्षांच्या करिअरमध्ये तब्बल ७०० बेपत्ता लोकांना शोधून काढले आहे.

# घरच्या घरी मातीशिवाय हिरव्या चाऱ्याचे उत्पादन कसे घ्यावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



उन्हाळ्याची चाहूल लागताच हिरव्या चाऱ्याची चणचण चालू होते. त्यात महागडे पशुखाद्यही जनावरांना सतत देणे परवडत नाही. त्यामुळे अशा अवस्थेत शेतकऱ्यांसाठी हायड्रोपोनिक पद्धतीने चारा मिळविणे सोपे होते. कमी वेळात, दर्जेदार हिरवा चारा मिळविण्यासाठी शेतकरी हायड्रोपोनिक शेतीचा वापर करू शकतात.

हायड्रोपोनिक ही मातीविना शेती करण्याची पद्धती आहे. यात फक्त पाणी किंवा पोषणतत्त्वयुक्त पाण्याचा माध्यम म्हणून वापर केला जातो. बियांची उगवण करून त्याची थोडी वाढ केली जाते. यात पाण्याचाही पुनर्वापर करणे शक्य आहे. त्यामुळे कमी जागेमध्ये, मर्यादित पाण्यामध्ये व १०-१२ दिवसांत पोषक अशा हिरव्या उपलब्धता करणे शक्य होते.
हायड्रोपोनिक्स चाऱ्याचे उत्पादन घेण्यासाठी एक विशिष्ट संरचनेची गरज असते. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील कृषी स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने संरचना (स्ट्रक्चर) तयार केली. त्यामध्ये संरचना उभारणीसाठी लोखंडी अँगलऐवजी ३ बाय २ बाय ३ मीटर आकाराचे यू-पीव्हीसी पाइप वापरले. या संरचनेमध्ये फॉगर सिस्टिम, टायमर, प्लॅस्टिक ट्रे आणि छताला ५० ते ७५ टक्के क्षमतेचे शेडनेट बसवले जाते. ही संरचना उष्णतेचा परिणाम कमी करत आर्द्रता वाढवते. त्यामुळे अशा नियंत्रित वातावरणात बियांची उगवण होऊन ते वेगाने वाढतात.

### साहित्य

१) प्लास्टिक ट्रे
२) फॉगर सिस्टीम (धुक्यासारखे पाणी फवारण्यासाठी)
३) टायमर
४) तावर ५० ते ७५ टक्के शेडनेट

### उत्पादनाची पद्धत

हायड्रोपोनिक पद्धतीने चारा तयार करण्यासाठी चांगल्या प्रतीचा गहू किंवा मका बियाणे निवडावे. बियाण्यांची उगवण क्षमता किमान ८० टक्क्यांपेक्षा अधिक असावी. सुरूवातीला संबंधित बियाणे स्वच्छ धुऊन १२ ते २४ तास पाण्यात भिजवत ठेवावे. नंतर त्यातील पाणी निथळून २४ ते ३० तास गोणीत झाकून ठेवून मोड आणावेत. मोड आलेले बियाणे ट्रेमध्ये पसरवून हायड्रोपोनिक स्ट्रक्चरच्या रॅकमध्ये ठेवावे. बाहेरील तापमानाचा विचार करून दर दोन तासांनी दोन मिनिटे किंवा दर तासाला एक मिनीट या वारंवारितेने फॉगरद्वारे अत्यंत सूक्ष्म थेंबानी (धुके) तयार करावे. त्यामुळे शेडमध्ये आर्द्रतायुक्त वातावरण राहते. प्रति ट्रे २५० ते ३०० मि.लि. पाणी दररोज लागते.
१० ते १२ दिवसांत २० ते ३० सें.मी. उंचीचा हिरवा चारा तयार होतो. हा सकस हिरवा चारा जनावरांना दिल्यास त्यांची उत्पादकता नक्की वाढते.

### हायड्रोपोनिक चाऱ्याचे फायदे

१) मातीशिवाय वर्षभर चारा उत्पादन शक्य : या पद्धतीत माती लागत नाही. त्यामुळे पावसावर किंवा जमिनीवर अवलंबून राहावे लागत नाही. उन्हाळा, पावसाळा किंवा हिवाळा, कोणत्याही हंगामात चारा तयार करता येतो.
२) खूप कमी पाण्यात उत्पादन : हायड्रोपोनिक पद्धतीत पाणी पुन्हा वापरले जाते. त्यामुळे पारंपरिक शेतीपेक्षा ८० ते ९० टक्के कमी पाणी लागते. पाणीटंचाई असलेल्या भागासाठी ही मोठी सोय आहे.
३) कमी जागेत जास्त उत्पादन : ही पद्धत शेडमध्ये किंवा छोट्या जागेत करता येते. एकाच जागेत अनेक ट्रे ठेवता येतात. त्यामुळे कमी क्षेत्रात जास्त चारा तयार होतो.
४) मजुरांची गरज कमी : नांगरणी, पेरणी, खुरपणी अशी कामे नसतात. त्यामुळे रोज जास्त मजूर लागत नाहीत. एक-दोन माणसेही ही व्यवस्था सहज सांभाळू शकतात.
५) ८ ते १० दिवसांत चारा तयार : पारंपरिक पद्धतीत चारा तयार व्हायला ४५-६० दिवस लागतात. पण हायड्रोपोनिक्समध्ये फक्त ८-१० दिवसांत हिरवा चारा तयार होतो.
६) चाऱ्याची वैशिष्ट्ये : हा चारा कोवळा आणि स्वच्छ असतो. जनावरे तो आवडीने खातात. तो लवकर पचतो आणि दूध उत्पादन वाढण्यास मदत करतो.
७) कोरडवाहू व अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ज्यांच्याकडे जमीन कमी आहे किंवा पाणी उपलब्ध नाही, अशा शेतकऱ्यांसाठी ही पद्धत खूप फायदेशीर आहे. कमी खर्चात स्वतःच्या जनावरांसाठी चारा तयार करता येतो.

### यूपीव्हीसी पाइपचा वापर फायद्याचा

साधारणपणे अनेक शेतकरी हायड्रोपोनिक शेड उभारण्यासाठी एमएस स्टील किंवा जीआय पाइपचा वापर करतात. मात्र या पद्धतीमध्ये सतत पाणी आणि आर्द्रता असल्यामुळे असे लोखंडी पाइप लवकर गंजतात आणि काही काळानंतर संरचना कमकुवत होते. याच्या तुलनेत युपीव्हीसी पाइप वापरल्यास गंज लागत नाही आणि संरचना जास्त काळ मजबूत राहते. युपीव्हीसी पाइपचा खर्चही स्टील किंवा जीआय पाइपपेक्षा कमी येतो. हे पाइप वजनाने हलके असल्यामुळे शेड एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवणे सोपे जाते. तसेच ऊन, वारा आणि पावसाचा यावर फारसा परिणाम होत नाही. म्हणून हायड्रोपोनिक चारा उत्पादनासाठी संरचना उभारताना युपीव्हीसी पाइपचा वापर करणे शेतकऱ्यांसाठी अधिक फायदेशीर आणि टिकाऊ ठरतो.

### एलईडी दिव्यांचा वापर

हायड्रोपोनिक पद्धतीने हिरवा चारा लवकर वाढण्यासाठी प्रकाश हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. योग्य प्रमाणात आणि योग्य प्रकारचा प्रकाश मिळाल्यास झाडांमध्ये प्रकाश संश्लेषणाची प्रक्रिया वेगाने होते. त्यामुळे चाऱ्याची वाढ चांगली होते. संशोधनातून असे आढळून आले आहे, की गहू आणि मका या चारा पिकांसाठी रात्रीच्या वेळेस सुमारे १२ तास लाल व जांभळ्या रंगाचा एलईडी प्रकाश (सुमारे ९३० लक्स तीव्रतेचा) दिल्यास चाऱ्याची वाढ अधिक जलद होते. तसेच तयार होणाऱ्या चाऱ्यातील पोषणमूल्य वाढते आणि एकूण उत्पादनही जास्त मिळते. म्हणून हायड्रोपोनिक शेडसारख्या नियंत्रित वातावरणात चारा उत्पादन करताना एलईडी दिव्यांचा वापर करणे शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आणि उपयोगी ठरते.

# नाशिकमध्ये अवतरला 'बोलणारा हत्ती'!

## डोळे मिचकावतो, कान हलवतो...३७५ किलो एलीची किमया...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अगदी हुबेहूब जीवंत भासणाऱ्या 'एली' हा ॲनिमॅट्रॉनिक हत्ती येथील इस्पॅलिअर स्कूलमध्ये सादर करण्यात आला. या हत्तीभोवती एक कथा गुंफण्यात आली असून, ती कथाही यावेळी ऐकविण्यात आली. यासाठी निमित्त ठरले पेटा इंडिया, इस्पॅलिअर द हेरिटेज स्कूल आणि उपाध्याय फाऊंडेशन यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमाचे.

'एली' हा आशियातील पहिला रोबोटिक हत्ती असल्याचे सांगण्यात आले. पेटा इंडिया या संस्थेने मे २०२३ मध्ये प्राण्यांबद्दल संवेदनशीलता व सजगता निर्माण करणारा ॲनिमॅटॉनिक हत्ती तयार केला असून, हा हत्ती आपली कहाणी शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना सांगतो. त्यासाठी अभिनेत्री दिया मिर्झा यांचा आवाज वापरण्यात आला आहे. यावेळी एलीने डोळे मिचकावणे, कान हलवणे अशा हालचाली करून शेकडो विद्यार्थ्यांना थक्क केले.

प्राण्यांबद्दल नव्या पिढीमध्ये संवेदनशीलता, दयाळूपणा आणि करुणा निर्माण करण्याच्या दृष्टीने एली हत्तीची ही गोष्ट अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारी ठरेल, असे मत यावेळी नाशिक परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी व्यक्त केले. शिक्षण अभ्यासक सचिन जोशी यांनी या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना हत्ती जंगलातले प्राणी आहेत, कैदेत राहणारे नाहीत, हे समजल्याचे सांगितले.

प्राजक्ता जोशी, उपाध्याय फाऊंडेशनच्या सहसंस्थापक बृंदा उपाध्याय, पेटा इंडियाच्या प्राथमिक शिक्षण व्यवस्थापक मीनाक्षी नारंग यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. डॉ. प्राजक्ता जोशी, मीनल शाह, अनुष्का यादव यांचीही उपस्थिती यावेळी होती. इस्पॅलिअर हेरिटेज स्कूलच्या मुख्याध्यापिका अंकिता कुरिया यांनी नियोजन केले.

### ॲनिमॅट्रॉनिक हत्ती 'एली' कसा आहे?

सिलिकॉन व फायबर तसेच पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करत ॲनिमॅट्रॉनिक हत्ती 'एली' तयार करण्यात आला आहे. त्याचे वजन सुमारे ३७५ किलो, उंची ६.५ फूट, रुंदी ४.५ फूट आणि लांबी ८ फूट आहे. रोबोटिकच्या माध्यमातून डोळे, कान आणि सोंड यांची हालचाल करणारा हा हत्ती स्वतःची संवेदनशील कथाही सांगतो. पेटा इंडिया आणि इस्पॅलिअर स्कूल यांच्यावतीने नाशिकमधील १६ शाळांमध्ये 'एली' जाणार असून, विद्यार्थ्यांना प्राण्यांविषयी संवेदनशील, दयाळूपणा व आदरभाव जपण्याचा संदेश देणार आहे.

# १ करोड़ रुपये की नौकरी का ऑफर ठुकराया, आज ५० करोड़ की कंपनी की है मालकिन...!

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आज के समय में हर कोई नौकरी करना चाहता है और जल्द से जल्द अपनी सैलरी बढ़ाना चाहता है। लेकिन आज हम आपको एक ऐसी महिला के बारे में बताएंगे जिन्होंने १ करोड़ रुपये की नौकरी के ऑफर को ठुकरा दिया और अपना खुद का बिजनेस शुरू करने का फैसला लिया। उनकी मेहनत और लगन ने उन्हें सफलता की बुलंदियों तक पहुंचाया।

### आरुषी अग्रवाल की कहानी

उत्तर प्रदेश के गाजियाबाद के नेहरू नगर की रहने वाली आरुषी अग्रवाल ने अपनी पढ़ाई पूरी करने के बाद एक बड़ी कंपनी में नौकरी करने का अवसर मिला। उन्हें १ करोड़ रुपये का पैकेज ऑफर किया गया था, लेकिन आरुषी ने इसे ठुकरा दिया और अपना खुद का स्टार्टअप शुरू करने का फैसला लिया।

### शुरू किया अपना बिजनेस

आरुषी ने टैलेंटडीक्रिप्ट नाम से एक कंपनी शुरू की, जो कोडिंग आधारित एग्जाम प्लेटफॉर्म है। यह प्लेटफॉर्म कंपनियों में ऑनलाइन इंटरव्यू की तैयारी करवाता है और युवाओं को हैकथॉन के तहत वर्चुअल स्किल टेस्ट पास करना पड़ता है। आरुषि ने अपनी कड़ी मेहनत से अपनी कंपनी को बुलंदियों तक पहुंचाया।



### कोडिंग सीखने में लगा दी जी-जान

आरुषी ने नोएडा के जेपी इंस्टीट्यूट से इंजीनियरिंग की पढ़ाई पूरी की और आईआईएम से मैनेजमेंट का कोर्स किया। इसके बाद उन्होंने आईआईटी दिल्ली से अपनी इंटर्नशिप पूरी की। आरुषि ने कोडिंग में महारत हासिल करने के लिए कड़ी मेहनत की और साल २०१८ के अंत तक उन्होंने कोडिंग में महारत हासिल कर ली।

### सिर्फ १ लाख से शुरू किया था अपना बिजनेस

आरुषी ने साल २०२० में सिर्फ १ लाख रुपये से टैलेंटडीक्रिप्ट की शुरुआत की थी। आज उनकी कंपनी दुनियाभर की ३८० कंपनियों को सेवाएं प्रदान कर रही है और सैकड़ों युवाओं को रोजगार दे रही है। आरुषी की कंपनी का टर्नओवर आज ५० करोड़ रुपये है।

### सफलता की कहानी

आरुषी अग्रवाल की कहानी उन लोगों के लिए प्रेरणा है जो अपने सपनों को पूरा करने के लिए जोखिम उठाने को तैयार हैं। उनकी मेहनत और लगन ने उन्हें सफलता की बुलंदियों तक पहुंचाया है।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे




# महादेवांना प्रसन्न करण्यासाठी कोणत्या गोष्टी कराव्यात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्यामुळे भोळे महादेव लगेच प्रसन्न होतात, महादेवांना कोणत्या गोष्टी आवडतात?

**१) अभिषेक**

महादेवांच्या पिंडीवर अभिषेक केल्याने हे भोळे शंकर लवकर प्रसन्न होतात. मग तो अभिषेक साधे पाणी, दूध, दही किंवा उसाचा रस यापैकी कोणत्याही द्रवाने केला तरी चालतो.

**२) फुले**

महादेवांना पांढरी फुले अर्पण केल्यास ते लगेच प्रसन्न होतात. मग आपण पांढरी फुले मुख्यत्वे धोतऱ्याची अर्पण करून महादेवांना प्रसन्न करू शकता.

**३) वृक्ष**

महादेवांना बेलाचे वृक्ष तसेच चंदनाचे वृक्ष हे सर्वांत प्रिय आहेत. मग आपण महादेवांना बेलाची पाने किंवा फळे अर्पण करू शकता. तसेच एखादे बेलाच्या झाडाचे किंवा चंदनाच्या झाडाचे रोपण करून ते जरी वाढवले व त्याची पूजा केली तरी त्याचे पुण्य अपार आहे. म्हणून या दिवशी बेलाच्या किंवा चंदनाच्या झाडाचे रोपण करावे किंवा ही झाडे दान द्यावीत. त्यामुळे भोळे शंकर प्रसन्न होतात.

**४) फळे, धान्य किंवा वस्त्र**

कवठ हे फळ महादेवांना अतिप्रिय आहे. तसेच बेल फळ किंवा नारळ हे देखील महादेवांना प्रिय आहेत. महादेवांना मूठभर तांदूळ अर्पण करावेत किंवा केळी हे फळ महादेवांना अर्पण करावे किंवा अगदीच काही नसेल तर खडीसाखर अर्पण करावी. तसेच शुभ्र वस्त्र महादेवांना प्रिय असल्याने ते देखील आपण अर्पण करू शकता.

**५) स्तोत्रे**

शिवस्तुतीचा पाठ वाचावा. शिवस्तुती ही सर्वांत लवकर फलदायी होते. याने महादेव लगेच प्रसन्न होतात. तसेच शिवकवच पठण हे देखील अत्यंत उपयुक्त आहे.

**६) उपासना मंत्र**

॥ ओम नमः शिवाय॥ हा मंत्र अतिशय प्रभावी मंत्र आहे. या मंत्राच्या सततच्या जपाने श्री महादेव लगेच प्रसन्न होतात. साधकाच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात. या मंत्राची शक्ती अद्भुत आहे. या मंत्रासाठी दीक्षा, होम, संस्कार, मुहूर्त, गुरुमुखाने उपदेश इत्यादी कसलीही आवश्यकता नसते. या मंत्रात सर्व वेद व उपनिषधे यांचे सार सामावले आहे.

**७) दान धर्म**

सध्या कलियुग चालू आहे नि कलियुगात दान देणे हे अनन्यसाधारण पुण्यकर्म समजले जाते. म्हणूनच श्री महादेवांना ज्या वस्तू प्रिय आहेत त्यापैकी कोणतीही एक वस्तू जर आपण गोरगरिबांना दान केली तर त्याचेही फळ लाखोपटीने वाढते. यामध्ये आपण दूध, तांदूळ, केळी, खडीसाखर, पांढरे वस्त्र, नारळ, बेल व चंदन या झाडाची रोपे या गोष्टी दान देऊ शकता. त्याने पुण्यसंचय वाढून जीवनात सुखसमृधी प्राप्त होते यात शंकाच नाही.

**८) ध्यान आणि शांतता**

शंभू महादेवांना ध्यान व शांतता या दोन गोष्टी अत्यंत प्रिय आहेत. ज्या घरात रोज ध्यानधारणा होते व ज्या घरात कलह नसतो त्या घरावर महादेवांची अपार कृपा असते. म्हणून प्रत्येकाने रोज सकाळी अंघोळीनंतर दहा मिनिटे व रात्री झोपताना दहा मिनिटे महादेवांचे ध्यान करावे. यावेळी घरात शांतता ठेवावी व चंदनाचा धूप लावावा. त्याने अपार मानसिक व शारीरिक शक्ती प्राप्त होतात व घरात बरकत होते. दारिद्र्य दूर होते.

**९) मनातील इच्छा बोलणे**

ज्याप्रमाणे मूल रडल्यावर त्याची आई त्याला दूध पाजते. म्हणजेच मुलाच्या इच्छेला आई लगेच प्रतिसाद देते. त्याचप्रमाणे आपण या महादेवांची उपासना केल्यावर हे भोळे शंकर नक्कीच प्रसन्न होतात आणि प्रसन्न झाल्यावर आपण आपल्या मनातील इच्छा या देवतेस बोलून दाखविली तर ती नक्कीच पूर्ण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. ही इच्छा आपण आपल्या मनात सतत घोळवावी. त्याने फलप्राप्ती लवकर होते.
खाली दिलेली ही इच्छा एका कागदावर लिहून काढावी व रोज म्हणावी त्याने मनातल्या सर्व इच्छा पूर्ण होतील.
"हे शंकरा, मी तुला शरण आलो आहे. साक्षात तूच माझा आत्मा असून, माझी बुद्धी म्हणजे पार्वती माता होय. माझे प्राण म्हणजे शिवगण आणि देह म्हणजे शिवालय आहे. सारे विषयभोग म्हणजेच तुमची पूजा असून, झोप ही समाधी आहे. माझे चालणे म्हणजे तुमची प्रदक्षिणा करणे, बोलणे म्हणजे तुमची स्तुती करणे असून, मी जी-जी कर्मे करतो ती सारी तुमची आराधनाच करतो आहे. माझ्या हात, पाय, वाणी, कान, डोळे, मन, देह यापैकी कशानेही जी पातके जाणतेपणी किंवा अजाणतेपणी घडली असतील त्या सर्वांना तू क्षमा कर. कारण तू दयेचा सागर आहेस. हे महादेवा तुझा जय जय कर असो.

महाशिवरात्रीच्या निमित्ताने प्रत्येक राशीनुसार गरिबांना कोणत्या प्रकारचे दान करावे याविषयी थोडेसे.

महाशिवरात्रीला शिवशंकर यांना साध्या थंड पाण्याने अभिषेक केला असता तसेच विविध वस्तूंचे दान गरिबांना केले असता महादेव मनातील इच्छा पूर्ण करतात, असा अनुभव आहे. या अभिषेकाचा व दानाचा महिमा अपार आहे. तसेच कुंडलीत ज्या ग्रहांचा दोष आहे ते दोष सुद्धा या दानामुळे दूर होतात.

**॥ ॐ नमः शिवाय ॥**

# शिव सहस्त्रनाम स्तोत्रम् – अर्थासह मराठी भावार्थानुसार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**(१२१) अभिरामः सुरगणो विरामः सर्वसाधनः।
ललाटाक्षो विश्वदेवो हरिणो ब्रह्मवर्चसः॥**

**अर्थ :** अभिराम–अत्यंत रमणीय व प्रिय, सुरगण–देवगणांचा प्रिय, ललाटाक्ष–तिसऱ्या नेत्राचा स्वामी, ब्रह्मवर्चस–ब्रह्मतेजाने प्रकाशित.

**भावार्थ :** शिव हे सौंदर्य, तेज आणि ज्ञान यांचे मूर्त स्वरूप आहेत. त्यांचे तिसरे नेत्र केवळ विनाशाचे नव्हे, तर ज्ञानप्रकाशाचे प्रतीक आहे. त्यांच्या तेजस्वी स्वरूपामुळे भक्तांच्या अंतःकरणात शुद्धता आणि बल उत्पन्न होते.

**(१२२) स्थावराणां पतिश्चैव नियमेन्द्रियवर्धनः।
सिद्धार्थः सिद्धभूतार्थोऽचिन्त्यः सत्यव्रतः शुचिः॥**

**अर्थ :** स्थावराणां पतिः– पर्वत, वनस्पती यांचा अधिपती, नियमेन्द्रियवर्धन– संयम आणि इंद्रिय नियंत्रण देणारा, सत्यव्रत–सत्याचा पालनकर्ता, शुचि–शुद्ध आणि निष्पाप.

**भावार्थ :** शिव हे सजीव आणि निर्जीव सर्वांचे स्वामी आहेत. ते संयम आणि नियंत्रणाचे मूर्त स्वरूप आहेत. त्यांच्या उपासनेने सत्य, शुचिता आणि आत्मसंयमाची भावना जागृत होते.

**(१२३) व्रताधिपः परं ब्रह्म भक्तानां परमा गतिः।
विमुक्तो मुक्ततेजाश्च श्रीमान्श्रीवर्धनो जगत्॥**

**अर्थ :** व्रताधिप– सर्व व्रतांचे अधिष्ठाता, परं ब्रह्म– परम तत्त्व, भक्तानां परमा गतिः– भक्तांची अंतिम मंजिल, विमुक्त–मोक्षरूप, श्रीवर्धन–समृद्धी आणि मंगलता देणारा.

**भावार्थ :** शिव हे भक्तांच्या सर्व व्रतांचे रक्षक आहेत. तेच परब्रह्म आणि मोक्षाचे द्वार आहेत. त्यांची कृपा मिळाल्यास जीवनात श्री, शांति आणि मुक्तीची प्राप्ती होते.

**(१२४) ईशानः सर्वविद्यानां ईश्वरः सर्वभूतनां।
ब्रह्माधिपो ब्रह्मण्यो ब्रह्मज्ञो ब्रह्मणः प्रियः॥**

**अर्थ :** ईशान– सर्व ज्ञानांचे मूळ, ईश्वर–सर्व प्राण्यांचा अधिपती, ब्रह्माधिप–वेदांचा अधिष्ठाता, ब्रह्मणः प्रियः– ज्ञान आणि सत्याचा उपासक.

**भावार्थ :** शिव हे ईशान दिशेचे रक्षक आणि सर्व विद्या–शास्त्रांचे मूळ आहेत. ते ब्रह्मज्ञानाचे मूर्त स्वरूप असून सत्यावर प्रेम करणारे आहेत. ते भक्ताला आत्मज्ञान देतात आणि अज्ञानाचा अंधकार दूर करतात.

**(१२५) सर्वज्ञः सर्वभूतस्थो महादेवो महेश्वरः।
निःश्रेयसः शान्तनिधिः परमो ज्ञानमुत्तमम्॥**

**अर्थ :** सर्वज्ञ–सर्व जाणणारा, सर्वभूतस्थ–प्रत्येक प्राण्यात वास करणारा, महादेव– सर्वोच्च देव, शांतनिधि–शांतीचा साठा.

**भावार्थ :** शिव हे सर्वज्ञ, सर्वव्यापी आणि महेश्वर आहेत. त्यांच्या स्मरणाने मन शांत होते आणि ज्ञानाचे द्वार उघडते. तेच निःश्रेयस म्हणजेच आत्मिक उत्कर्षाचा मार्ग आहेत.

**(१२६) आदियोगी महायोगी योगाध्यायो योगसाधकः।
योगीशो योगनायकः योगसंयमवित्प्रभुः॥**

**अर्थ :** आदियोगी–पहिला योगी, महायोगी–सर्वोच्च तपस्वी, योगनायक–योगपथाचा मार्गदर्शक, संयमवित् मन आणि इंद्रियांचे नियमन करणारा.
**भावार्थ :** शिव हे योगाचे मूर्त रूप आहेत. त्यांनीच ध्यान, प्राणायाम आणि समाधीचा मार्ग दाखवला. ते योगमार्गावर साधकाला संयम, स्थैर्य आणि आत्मज्ञान देतात. त्यांचे ध्यान म्हणजे आत्मसाक्षात्काराचा सर्वोच्च मार्ग.

**(१२७) कालभैरवः कालात्मा कालज्ञः कालसंहरः।
कालकर्ता कलानाथो कालाधीशः कलाप्रदः॥**

**अर्थ :** कालभैरव–काळावर अधिपत्य असणारा, कालात्मा–काळस्वरूप, कालसंहर–प्रलयकर्ता, कलाधीश–कलांचे अधिपती.

**भावार्थ :** शिव काळाचेही स्वामी आहेत. ते काळाला जन्म देतात आणि त्याचा अंतही करतात. ते कलांचे आणि विज्ञानांचे रक्षक आहेत. त्यांचे स्वरूप भय आणि करुणा दोन्हीचे संतुलन आहे. 'कालभैरव' म्हणून ते धर्माचे पालन करतात.



**(१२८) त्रिलोकेश्वरः त्रिलोकात्मा त्रिलोकज्ञः त्रिनेत्रधृत्।
त्रिपुरान्तकः त्रिमूर्तिः त्रिदेवः त्रिगुणात्मवान्॥**

**अर्थ :** त्रिलोकेश्वर–तीन लोकांचा स्वामी, त्रिनेत्रधृत– तीन नेत्रांचा धारक, त्रिपुरान्तक–त्रिपुरासुरांचा संहारक, त्रिगुणात्मवान्– सत्त्व, रज, तम यांचा अधिपती.

**भावार्थ :** शिव हे त्रिमूर्तीस्वरूप आहेत. ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्यातील एकात्मता. ते सृष्टी, स्थिती आणि संहाराचे कारण आहेत. त्यांचे त्रिनेत्र हे भूत, वर्तमान आणि भविष्याचे प्रतीक आहे.

**(१२९) पिनाकपाणिः खी च धन्वी च बाणधारकः।
अशनी शूलधारी च कपालमाल्यविभूषितः॥**

**अर्थ :** पिनाकपाणि–पिनाक धनुष्य धारण करणारा, शूलधारी–त्रिशूलधारी, कपालमाल्य–मस्तकांची माळ धारण करणारा.

**भावार्थ :** शिवाचे शस्त्र हे धर्मरक्षणाचे प्रतीक आहेत. त्यांचा त्रिशूल तीन गुणांवरील (सत्त्व, रज, तम) विजयाचे चिन्ह आहे. ते विनाश करून सृष्टीला नवीन आरंभ देतात.

**(१३०) महाकालो महाशक्तिः महेशः पुरुषोत्तमः।
महायज्ञो महातेजाः महाप्रसादवित्प्रभुः॥**

**अर्थ :** महाकाल–काळाचा नाश करणारा, महाशक्ती–अनंत ऊर्जा, महायज्ञ सृष्टीरक्षणासाठी स्वतःचा अर्पणकर्ता.

**भावार्थ :** शिव हे महाकाल आहेत. ते काळावर अधिपत्य ठेवतात. ते सृष्टीच्या यज्ञात स्वतःला समर्पित करतात. तेच परब्रह्म, अनंत शक्ती आणि कृपेचे अधिष्ठान आहेत.

**(१३१) सर्वात्मा सर्वदर्शी च सर्वलोकनमस्कृतः।
सर्वज्ञः सर्वगोप्ताच सर्वभावकरो हरिः॥**

**अर्थ :** सर्वात्मा–सर्वांच्या अंतःकरणात वास करणारा, सर्वदर्शी–सर्वज्ञानी दृष्टा, सर्वलोकनमस्कृतः–सर्वांच्या पूजनीय, सर्वभावकर–सर्व भावनांचा जनक.

**भावार्थ :** शिव सर्वत्र व्यापलेले आहेत. ते सर्व जीवांच्या अंतःकरणात वास करून त्यांचे सुख–दुःख अनुभवतात. त्यांची कृपा सर्व भावनांना पवित्र करते.

**(१३२) सृष्टिकर्ता जगद्धाता प्रलयं कर्तुमक्षमः।
संहारकर्ता सर्वेशः सदा शिवो जगत्पतिः॥**

**अर्थ :** सृष्टिकर्ता–निर्मितीचा अधिपती, जगद्धाता–पालनकर्ता, संहारकर्ता–विनाशकर्ता.

**भावार्थ :** शिव सृष्टी, स्थिती आणि संहार या तिन्ही कार्यांचे केंद्र आहेत. ते सृष्टी निर्माण करतात, तिचे रक्षण करतात आणि योग्य वेळेवर प्रलय घडवतात.

**(१३३) शिवो ज्ञानस्वरूपश्च शिवो भक्तिप्रदः सदा।
शिवो रक्षकदातार्थः शिवः सर्वार्थसाधकः॥**

**अर्थ :** ज्ञानस्वरूप–परिपूर्ण चेतनेचा मूळ, भक्तिप्रद–भक्ति देणारा, रक्षकदात–रक्षण व दान दोन्ही करणारा.

**भावार्थ :** शिव हे ज्ञान आणि भक्ती यांचे मूळ आहेत. ते भक्ताचे सर्व संकटांपासून रक्षण करतात आणि इच्छित फळ देतात.

**(१३४) शरण्यः सर्वलोकानां पालनं करुणानिधिः।
दुःखहारि सुखदाता च प्रजावर्धनकारकः॥**

**अर्थ :** शरण्य–शरणागती स्वीकारणारा, करुणानिधि–दयासागर, दुःखहारि–दुःख दूर करणारा, सुखदाता–आनंद प्रदान करणारा.

**भावार्थ :** शिव दयाळू आहेत. जो त्यांच्याकडे श्रद्धेने येतो, त्याला ते सुख, शांती आणि प्रगती देतात. त्यांच्या कृपेने दुःखाचा अंत आणि आत्मसुखाचा आरंभ होतो.

**(१३५) सत्यं शिवं सुन्दरं च ब्रह्म रूपं सनातनम्।
ज्ञानं विज्ञानमत्यन्तं मोक्षं यः प्रददाति सः॥**

**अर्थ :** सत्यं–सत्याचे मूर्त स्वरूप, शिवं–कल्याणाचे प्रतीक, सुन्दरं–निर्मळ सौंदर्य, मोक्षप्रद–मुक्ती देणारा.

**भावार्थ :** शिव म्हणजे सत्य, शिव आणि सौंदर्य यांचा संगम. त्यांची उपासना मन, वाणी आणि कर्म यांना शुद्ध करते. तेच मुक्ती व परमज्ञान देणारे ब्रह्म आहेत.

**(१३६) वेदसारः परो धाता चतुर्वेदविदां पतिः।
वेदान्तज्ञानसंपन्नो ब्रह्मतत्त्वप्रकाशकः॥**

**अर्थ :** वेदसार–वेदांचा साररूप, चतुर्वेदविद –चारही वेदांचा ज्ञाता, ब्रह्मतत्त्वप्रकाशक–ब्रह्माचे ज्ञान देणारा.

**भावार्थ :** शिव हे वेदांचे मूळ आहेत. तेच वेदान्तातील अद्वैत ब्रह्माचे तत्त्व स्पष्ट करतात. त्यांचे स्मरण हे वेदाध्ययनाचे सार आहे.

**(१३७) रुद्रोऽघोरा महाघोरो नीलकण्ठो महेश्वरः।
त्र्यम्बको जगतां नाथो मृत्युञ्जयः सदा हरिः॥**

**अर्थ :** रुद्र– रडणाऱ्यांचे दुःख हरतो, घोरा–भयानक रूप धारण करणारा, नीलकण्ठ–विषपानाने जगाचे रक्षण करणारा, त्र्यम्बक–तीन नेत्रधारी.

**भावार्थ :** शिवाने समुद्र मंथनावेळी विषपान करून जगाचे रक्षण केले. त्यामुळे त्यांचा कंठ निळा झाला म्हणून 'नीलकण्ठ'. ते मृत्यूलाही जिंकतात म्हणूनच मृत्युञ्जय.

**(१३८) शिवः शान्तो दयानाथः सर्वप्राणनमस्कृतः।
सर्वेशो जगतां नाथः सृष्टिसंहारकारकः॥**

**अर्थ :** शान्त–शांतचित्त, दयानाथ–दयाधन, सर्वेश–सर्वांचा ईश्वर.

**भावार्थ :** शिव हे करुणा आणि शांतीचे मूर्त स्वरूप आहेत. ते प्रत्येक प्राण्याच्या अंतःकरणात प्रेम व शांतता प्रस्थापित करतात.

**(१३९) आद्यान्तहीनो निर्गुणो निर्लेपः परमेश्वरः।
अनादिनिधनो देवो योगीशोऽखिलकारकः॥**

**अर्थ :** आद्यान्तहीन– ज्याला आरंभ व अंत नाही, निर्गुण–गुणातीत, निर्लेप–कर्मफळापासून मुक्त.

**भावार्थ :** शिव हे काल, गुण, कर्म यांच्याही पलीकडील तत्त्व आहेत. ते अनादि–अनंत असून संपूर्ण विश्व त्यांच्यात विलीन होते.

**(१४०) फलश्रुती
इति श्रीशिवसहस्रनामस्तोत्रं पुण्यं पावनमुत्तमम्।
यः पठेत् श्रद्धया नित्यं स सर्वान् कामनाञ्छुते॥**

**अर्थ :** हे स्तोत्र पवित्र, पुण्यदायी आणि मोक्षप्रद आहे. जो श्रद्धेने याचे पठण करतो, त्याच्या सर्व इच्छांची पूर्ती होते.

**भावार्थ :** शिव सहस्रनाम हे भक्तासाठी अमृत आहे. याच्या पठणाने पाप नष्ट होते, मन प्रसन्न होते आणि मोक्ष निश्चित मिळतो.

**समाप्त**

# भगवान शिवांचा तिसरा डोळा उघडणे : आध्यात्मिक प्रतीकवाद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान शिव यांचा तिसरा डोळा उघडल्यानंतर कामदेवाचे (प्रेमाचे देव) दहन करणे ही हिंदू आध्यात्मिक परंपरेतील एक गहन आणि प्रतिकात्मक कथा आहे. ही केवळ एक पौराणिक घटना नाही तर ती आंतरिक आध्यात्मिक साधना आणि आत्मजागृतीचा एक शक्तिशाली संदेश देते.

## मुख्य आध्यात्मिक संदेश

- आध्यात्मिक प्रगतीसाठी कामाचा (इच्छा/वासना/आसक्ती) संपूर्ण नाश आवश्यक आहे.
- जेव्हा एखादा साधक खोल तपस्या, ध्यान किंवा आत्मचिंतनात गुंततो तेव्हा काम (इच्छा/वासना/आसक्ती) सर्वांत मोठा अडथळा बनतो. शिवांचा तिसरा डोळा उघडणे हे दर्शविते की सर्वोच्च ज्ञानासाठी जागृत झाल्यावर सर्व सांसारिक इच्छा आणि वासना आपोआप नष्ट होतात.
- कामदेवाचे दहन हे दर्शविते, की जेव्हा खरे ज्ञान (ज्ञानाची अग्नी) येते तेव्हा काम नावाचे काहीही उरत नाही.
- तिसरा डोळा = ज्ञानाचा डोळा, भ्रम आणि अहंकाराचा नाश करणारा.
- दोन्ही सामान्य डोळे बाह्य जग (द्वैत, भौतिक सुख आणि दुःख) पाहतात.
- तिसरा डोळा (अज्ञा चक्र) आतील सत्य पाहतो – तो सत्य पाहतो आणि खोटेपणा/भ्रम/भ्रम जाळून टाकतो.
- कामदेवाला जाळणे म्हणजे जेव्हा हा डोळा उघडतो तेव्हा सर्व इच्छा, आसक्ती आणि अहंकार राखेत जातात.
- क्रोध नाही, तर जागृती आणि शुद्धीकरणाची प्रक्रिया सुरू होते.



- शिवांचा क्रोध हा सामान्य क्रोध नाही – तो तपस्वीपणा आणि आतील अग्नीच्या शक्तीचे प्रतीक आहे.
- सद्गुरूंसारखे आध्यात्मिक शिक्षक स्पष्टपणे सांगतात, की शिवांनी बाह्य कामदेवाला पाहिले नाही, तर त्याच्या आत उठणारी वासना पाहिली आणि ती राखेत टाकली.

**संदेश**

खऱ्या आध्यात्मिक प्रवासात, इच्छा निर्माण होताच जाळली पाहिजे, अनुसरण करू नये.

**संतुलन आणि मुक्तीचा मार्ग**

कामदेवाला जाळल्यानंतरही भगवान शिवांनी त्याला (अनंगाच्या स्वरूपात) पुनर्जन्म दिला, परंतु शरीराशिवाय.

**अर्थ**

जगात प्रेम आणि निर्मितीची गरज कायम आहे, परंतु वासनेचे वर्चस्व आहे. वासना पूर्णपणे नष्ट झाली पाहिजे. ते साधकाला वासनेवर नियंत्रण ठेवण्यास शिकवते, परंतु त्यापासून मुक्त होऊन पुढे जाण्यास शिकवते.थोडक्यात सर्वांत मोठा संदेश असा आहे, की जेव्हा आंतरिक जागृती (तिसरा डोळा) उघडते तेव्हा सर्व सांसारिक इच्छा आणि आसक्ती आपोआप नष्ट होतात. हे मोक्षाच्या दिशेने पहिले मोठे पाऊल आहे जेथे एखादी व्यक्ती वासनेपासून मुक्त होते आणि शिवत्वाकडे (शुद्ध चेतनेकडे) जाते. म्हणूनच ही कथा म्हणते, की जेव्हा आंतरिक ज्ञान जागृत होते, तेव्हा बाह्य आसक्ती संपतात.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**